**<u>ठळक बातम्या</u>**

- केंद्र सरकारच्या मेक इन इंडिया अभियानामुळे भारत जगातलं महत्त्वाचं उत्पादन केंद्र बनल्याचं प्रधानमंत्र्यांचं मन की बातमधे प्रतिपादन, भंडारा जिल्ह्यातल्या रेशीम उद्योगाचा प्रधानमंत्र्यांकडून उल्लेख
- प्रधानमंत्र्यांच्या हस्ते महाराष्ट्रातल्या ११ हजार २४० कोटी रुपयांच्या विविध प्रकल्पांचं उद्घाटन, पायाभरणी आणि राष्ट्रार्पण
- स्त्री शिक्षणाच्या वारशाची आठवण करून देणारं स्मारक भिडे वाड्यात तयार होत असल्याचं देवेंद्र फडणवीस यांचं प्रतिपादन

  **आणि**

- फिफा फुटबॉल विश्वचषक स्पर्धा पुढच्या वर्षी १५ जूनपासून सुरू होणार

**<><><><><>**

केंद्र सरकारच्या मेक इन इंडिया या महत्वाच्या अभियानाला दहा वर्ष पूर्ण होत असल्याचं स्मरण प्रधानमंत्र्यांनी आजच्या मन की बात मध्ये केलं. प्रधानमंत्र्यांनी आकाशवाणीवर आज मन की बात या कार्यक्रमाच्या माध्यमातून देशवासीयांशी संवाद साधला. या कार्यक्रमाचा हा ११४ वा भाग होता. या अभियानानं गरीब, मध्यमवर्ग तसंच सूक्ष्म, लघु, आणि मध्यम उद्योग क्षेत्राला मोठा लाभ झाला. या अभियानानं प्रत्येक घटकाला आपली प्रतिभा जगासमोर आणायची संधी दिली असं ते म्हणाले. या अभियानामुळे आज भारत उत्पादनाचं केंद्र बनला आहे, प्रत्येक क्षेत्रातली निर्यात वाढली आहे आहे असं त्यांनी सांगितलं. परकीय गुंतवणुकीचं वाढतं प्रमाण हे या अभियानाची यशोगाथा सांगतं असं ते म्हणाले.

महाराष्ट्रात भंडारा जिल्ह्यातल्या पारंपरिक रेशीम उद्योगाचा उल्लेख प्रधानमंत्र्यांनी केला.

भंडारा टसर सिल्क हॅण्डलूम. नावाने ओळखल्या जाणाऱ्या या उद्योगात भंडारा जिल्ह्यातले ५० पेक्षा जास्त स्वयंसहायता गट कार्यरत आहेत. या कामात महिलांचा सर्वाधिक सहभाग आहे. या रेशीम उत्पादनाला लोकप्रियता मिळत असून स्थानिक समुदायही सक्षम होतो असल्याचं सांगून, हाच मेक इन इंडियाचा गाभा असल्याचं प्रधानमंत्री म्हणाले.

स्वच्छताही सेवा या उपक्रमाअंतर्गत देशभरात सुरु असलेल्या अभिनव स्वच्छता मोहिमा आणि कचऱ्याच्या पुनर्वापराबद्दलही प्रधानमंत्र्यांनी श्रोत्यांना सांगितलं. येत्या २ ऑक्टोबरला स्वच्छ भारत अभियानाच्या अंमलबजावणीलाही १० वर्षं पूर्ण होत असल्याचा उल्लेख त्यांनी केला. या अभियानाला लोक चळवळीचं रूप देणाऱ्या प्रत्येकाचे त्यांनी आभार मानले. हे अभियान म्हणजे या उद्देशासाठी आपलं जीवन समर्पित केलेल्या महात्मा गांधीजींना खरी श्रद्धांजली आहे असं ते म्हणाले. स्वच्छता मोहिम नैमित्तिक नाहीत तर ते निरंतर चालणारं काम आहे, असं त्यांनी सांगितलं.यावेळी प्रधानमंत्र्यांनी एक पेड माँ के नाम या अभियानाला मिळत असलेल्या यशाची, या अभियानाअंतर्गत देशभरात कोटींच्या संख्येनं सुरू असलेल्या रोप लागवडीची तसंच, वृक्ष संवर्धनांच्या कल्पक उपक्रमांची माहिती श्रोत्यांना दिली. देशभरात गेल्या काही दिवसांत झालेल्या पावसाचा संदर्भ देत त्यांनी सरकाच्या कॅच द रेन या संकल्पेनाचा उल्लेख केला आणि पुन्हा एकदा मन की बात मधून जलसंवर्धानाचं महत्व श्रोत्यांसमोर मांडलं. यानिमित्तानं त्यांनी महिलांनी राबवलेल्या अनोख्या नदी संवर्धन आणि जलसंवर्धन उपक्रमांची तसंच पाणी टंचाई दूर करण्यासाठी केलेल्या प्रयत्नांची माहिती श्रोत्यांना दिली.

आपल्या अलिकडच्या अमेरिका दौऱ्यात अमेरिका सरकारनं भारताला सुमारे ३०० प्राचीन कलाकृती परत केल्याची, आणि त्यातल्या कलाकृतींची तपशीलवार माहिती त्यांनी श्रोत्यांना दिली. मात्र अशा कलाकृती अवैध मार्गांनी देशाबाहेर नेणं हा गंभीर गुन्हा आणि आपला वारसा संपवण्यासारखी कृती आहे असं ते म्हणाले. देशातल्या नागरिकांची प्रतिभा आणि सृजनशक्तीला प्रोत्साहन देण्यासाठी केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्रालयानं सुरू केलेल्या Create in India या उपक्रमाची माहिती त्यांनी श्रोत्यांना दिली. याअंतर्गत आखलेल्या २५ आव्हानांमध्ये सहभागी व्हावं, आणि आपली सर्जनशीलता जगासमोर आणावी, यासाठी वेव्ह्स इंडिया डॉट ओआरजी (wavesindia.org) या संकेतस्थळाला भेट द्यावी, असं आवाहनही त्यांनी केलं.

आगामी सणांनिमित्त शुभेच्छा देतानाच केवळ मेड इन इंडियाच उत्पादनांची खरेदी करण्याच्या जुन्या संकल्पाची उजळणी करावी, असं आवाहन त्यांनी केलं.

मन की बात या कार्यक्रमाला दहा वर्षं पूर्ण होत असल्याबद्दल त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. देशवासियांना नागरिकांना सकारात्मक माहितीची ओढ आहे हे मन की बात या कार्यक्रमानं सिध्द करून दाखवलं असं प्रधानमंत्री म्हणाले. मन की बात साठी देशाच्या कानाकोपऱ्यातील कोट्यवधी श्रोत्यांनी माहिती उपलब्ध करून दिली, हे श्रोतेच या कार्यक्रमाचे खरे सूत्रधार आहेत अशा शब्दांत त्यांनी श्रोत्यांची प्रशंसा केली.

**होल्ड बाईट - मंदिराचं दर्शन मोदी**

मन की बातच्या प्रसारणाची धुरा सांभाळणाऱ्या आकाशवाणी, दूरदर्शनसह, हा कार्यक्रम प्रसारित करणाऱ्या आणि त्यावर विविध कार्यक्रम रचणाऱ्या इतर दूरचित्रवाहिन्या आणि युट्युबर्सचेही यावेळी प्रधानमंत्र्यांनी आभार मानले.

**<><><><><>**

महाराष्ट्रातल्या ११ हजार २४० कोटी रुपयांच्या विविध प्रकल्पांचे उद्घाटन, पायाभरणी आणि राष्ट्रार्पण आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दूरस्थ पद्धतीनं केलं. पुण्यातल्या जिल्हा न्यायालय ते स्वारगेट या मेट्रो सेवेचे उद्घाटन मोदी यांच्या हस्ते झालं. त्याचबरोबर २ हजार ९५५ कोटी रुपये खर्चाच्या पुणे मेट्रो स्वारगेट- कात्रज विस्ताराची पायाभरणीही प्रधानमंत्र्यांच्या हस्ते झाली. पुण्यातल्या भिडेवाडा इथल्या सावित्रीबाई फुले यांनी सुरू केलेल्या पहिल्या मुलींच्या शाळेच्या स्मारकाचं भूमिपूजनही मोदी यांनी केलं. तसंच, राष्ट्रीय औद्योगिक कॉरिडॉर विकास कार्यक्रमांतर्गत बिडकीन औद्योगिक क्षेत्राचं लोकार्पणही मोदींच्या हस्ते आज झालं. यावेळी प्रधानमंत्र्यांच्या हस्ते सोलापूर विमानतळाचे उद्घाटनदेखील झालं. पुणे ही महान विभूतींची प्रेरणाभूमी असून महाराष्ट्राच्या विकासाच्या नव्या अध्यायाची साक्षीदार बनली आहे, असं प्रधानमंत्री याप्रसंगी म्हणाले.

**होल्ड -- बाईट --प्रधानमंत्री**

महाराष्ट्राला क्रांतीसूर्य महात्मा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी दिलेला वारसा पुढे नेणारा हा कार्यक्रम आहे, असं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. अनेकांनी विरोध करूनही सावित्रीबाईंनी मुलींसाठी शाळा सुरू केली, यामुळे मुलींना शिक्षणाची दारं उघडी झाली. या शिक्षणाच्या वारशाची आठवण करून देणारं स्मारक भिडे वाड्यात केलं जात आहे, हे स्मारक पुढचे अनेक वर्षे प्रेरणा देत राहील, असं फडणवीस म्हणाले.

देशाचा सर्वांगीण विकास करणं आणि सर्व घटकांचे प्रश्न सोडवणं हेच प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं उद्दिष्ट आहे असं उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले. प्रधानमंत्र्याच्या हस्ते

भूमिपूजन केलेल्या प्रकल्पांची उजळणी यावेळी पवार यांनी केली. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या बिडकीन इथं ५२ हजार कोटींचे प्रकल्प येत आहेत. त्यातून युवांच्या हाताला रोजगार मिळणार आहेत, याचं सर्वांना समाधान आहे असं पवार म्हणाले. फुले दाम्पत्याच्या स्मारकासाठी ज्यांच्या जमिनी संपादित कराव्या लागणार आहेत त्यांना योग्य मोबदला दिला जाईल, अशी ग्वाही पवार यांनी दिली.

**<><><><>**

साताऱ्यात पाटण विधानसभा मतदारसंघातल्या विविध कामांचं भूमीपूजन आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते होत आहे. लोकनेते बाळासाहेब देसाई बहुद्देशिय कृषी संकुलाचं उद्घाटन  आणि  नगरोत्थान योजनेतून मंजूर झालेल्या पाणी योजनेचं भूमीपूजन याचा यात समावेश आहे. त्यानंतर नाडे इथल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचं अनावरण मुख्यमंत्र्यांच्या हस्ते होईल. मल्हारपेठ इथं ग्रामसचिवालयाचे नुतनीकरण आणि नामकरण कार्यक्रमाला ते उपस्थित राहतील. पाटणमधल्या दौलतनगर मरळी इथल्या विविध विकास कामांचं ऑनलाईन भूमीपूजन आणि लोकार्पणही ते करणार आहेत.

**<><><><>**

शासकीय औद्योगिक संस्थांमधील तरुणींना स्वरक्षणाचं मोफत प्रशिक्षण दिलं जाणार आहे. त्या अनुषंगानं, ‘हर घर दुर्गा’ अभियानाचा प्रारंभ उद्या लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्या हस्ते होत असल्याची माहिती कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी दिली. ते आज वार्ताहरांशी बोलत होते. मुंबईच्या कुर्ला इंथल्या शासकीय औद्योगिक संस्थेत यासाठी आयोजित कार्यक्रमाला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांची उपस्थिती असणार आहे.

**<><><><>**

भारत आणि बांग्लादेशात कानपूर इथं सुरु असलेल्या दुसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्यात, पावसामुळे मैदान ओलं झाल्यानं आज तिसऱ्या दिवसाचा खेळ रद्द केला गेला. पावसामुळे काल दुसऱ्या दिवशी एकही चेंडू टाकला गेला नव्हता तर, पहिल्या दिवशी केवळ ३५ षटकांचा खेळ झाल्यानंतर खेळ थांबवावा लागला होता. त्यावेळी बांग्लादेशानं ३ बाद १०७ धावा केल्या होत्या. दोन सामन्यांच्या या मालिकेत भारत पहिला सामना जिंकून १-० नं आघाडीवर आहे.

**<><><><><>**

राज्य स्तरावरचा कृषी पुरस्कार सोहळा आज मुंबईत वरळी इथं संध्याकाळी होत आहे. या कार्यक्रमात राज्यपाल सी.पी राधाकृष्णन आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते कृषी क्षेत्रातल्या उल्लेखनीय कार्यासाठी तसंच पीकस्पर्धेच्या विजेत्यांना पुरस्कार प्रदान केले जाणार आहेत.

**<><><><><>**

स्वच्छता ही सेवा पंधरवड्यात आज सकाळी शीव पनवेल महामार्ग आणि ठाणे बेलापूर मार्ग या ठिकाणी स्वच्छता मित्रांनी स्वच्छता मोहीम राबवली. या स्वच्छता मोहिमेत स्वच्छता मित्रांसोबत महापालिका अधिकारी, कर्मचारी यांच्याबरोबर नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानचे सदस्य सहभागी झाले होते.

**<><><><><>**

फीफा विश्वचषक फूटबॉल स्पर्धेचं वेळापत्रक जाहीर झालं आहे. पुढच्या वर्षी म्हणजे १५जून २०२५ रोजी स्पर्धेचं उद्घाटन होणार असून एकूण १२ ठिकाणी सामने खेळले जाणार आहेत. फीफाचे अध्यक्ष गियान्नी इन्फॅन्टिनो यांनी काल सांगितलं की अमेरिकेत न्यू जर्सी इथल्या मेटलाईफ स्टेडीयमवर १३ जुलै २०२५ रोजी अंतिम

सामना होईल. ग्लोबल सिटिझन बरोबर  फीफा गरिबी निर्मूलन कार्यक्रमात भागीदार असेल असंही त्यानी जाहीर केलं.

**<><><><><>**

येत्या ३६ तासांत मराठवाड्यासह विदर्भ, कोकण, मध्य महाराष्ट्राचा काही भाग आणि गोवा इथे हलक्या ते मध्यम पावसाचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.